प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद कॉलेज व श्री.एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि.अहमदनगर

---

बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास परवानगी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक.पीजीए १२१७/प्र.क्र.१६५/१७/शिक्षण-२
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक:- ०५ नोव्हेंबर,२०१८

संदर्भ:- १) शासन पत्र समक्रमांक दिनांक १४/०६/२०१७
२) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/१३३१/२०१६, दिनांक ३०/१२/२०१८
३) केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.आर.१३०११/३१/२०१७-ईपी (आयएम-१) व आर.१४०११/१७/२०१७-ईपी (आयएम-१) दिनांक १७/१०/२०१८

**प्रस्तावना**:- प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद कॉलेज व श्री.एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि.अहमदनगर या महाविद्यालयातील बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्यास संदर्भ क्र.१ अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर संस्थेस संदर्भ क्र.३ अन्वये केंद्र शासनाचे आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांनी सन २०१८-१९ या एका शैक्षणिक वर्षाकरिता बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ८० वरुन १०० एवढी वाढ करण्यास सशर्त मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता उक्त पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:- केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाने उपरोक्त संदर्भाधीन पत्र क्र.३ अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद कॉलेज व श्री.एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि.अहमदनगर या महाविद्यालयातील बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता ८० वरुन १०० इतकी विद्यार्थी संख्या वाढ करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील:-

१. सदर आयुर्वेद महाविद्यालयातील बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार १०० विद्यार्थी इतकीच राहिल.
२. राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.
३. शासकीय नियम/कायदा तथा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.
४. केंद्र शासन, भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.
५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
६. शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्यांच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

AYURVED COLLEGE IN WARD NO.

७. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे वाढीव जागांकरिता संलग्निकरण प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशित करण्यात येऊ नये.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नये.

९. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक राहील.

१०. केंद्र शासनाने दिलेली सदर सशर्त परवानगी सन २०१८-१९ या वर्षासाठी असल्याने संस्थेने पुढील वर्षाचे (सन २०१९-२०) विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाची परवानगी/नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहिल.

११. केंद्रशासनाच्या संदर्भाधीन क्र.३ मधील पत्रात नमूद अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

३. सदर आदेश हे केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दिनांक १७/१०/२०१८ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अजित सासुलकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
सचिव, भारत सरकार, आयुर्वेद, योग व प्राकृतिक चिकित्सा, यूनानी, सिध्द एवं होमिओपॅथिक (आयुष) मंत्रालय, आयुष भवन, बी ब्लॉक, जी.पी.ओ.कॉम्प्लेक्स, आई.एन.ए, नवी दिल्ली-११० ०२३.
निबंधक,भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, ६१-६५,इन्स्टिटयूशनल एरिया,जनकपुरी, नवी दिल्ली-११० ०५८.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, आयुष संचालनालय,मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
सचिव,शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
प्राचार्य, प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद कॉलेज व श्री.एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि.अहमदनगर
निवडनस्ती (शिक्षण-२)

B

प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद कॉलेज व श्री.एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि.अहमदनगर

पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक.पीजीए १२१७/प्र.क्र.१६६/१७/शिक्षण-२

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,

नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

दिनांक:- ०५ नोव्हेंबर,२०१८

संदर्भ:- १) शासन पत्र समक्रमांक दिनांक १४/०६/२०१७

२) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/१३३२/२०१६, दिनांक ३०/१२/२०१८

३) केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.आर.१३०११/३१/२०१७-ईपी (आयएम-१) व आर.१४०११/१७/२०१७-ईपी (आयएम-१) दिनांक १७/१०/२०१८

**प्रस्तावना**:- प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद कॉलेज व श्री.एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि.अहमदनगर या महाविद्यालयातील कौमारभृत्य आणि पंचकर्म हे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे विषय प्रत्येकी ०६ विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास संदर्भ क्र.१ अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर संस्थेस संदर्भ क्र.३ अन्वये केंद्र शासनाचे आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांनी सन २०१८-१९ या एका शैक्षणिक वर्षाकरिता कौमारभृत्य (बालरोग) व आणि पंचकर्म हे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम विषय प्रत्येकी ०६ विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास सशर्त मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता उक्त पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे विषय सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:- केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाने उपरोक्त संदर्भाधीन पत्र क्र.३ अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद कॉलेज व श्री.एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि.अहमदनगर या महाविद्यालयात कौमारभृत्य (बालरोग) आणि पंचकर्म हे दोन पव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे विषय प्रत्येकी ०६ विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील:-

१. सदर आयुर्वेद महाविद्यालयातील कौमारभृत्य(बालरोग) आणि पंचकर्म या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार प्रत्येकी ०६ (सहा) विद्यार्थी इतकीच राहिल.

२. राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३. शासकीय नियम/कायदा तथा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४. केंद्र शासन, भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्यांच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

७. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे वाढीव जागांकरिता संलग्निकरण प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशित करण्यात येऊ नये.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नये.

९. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक राहील.

१०. केंद्र शासनाने दिलेली सदर सशर्त परवानगी सन २०१८-१९ या वर्षासाठी असल्याने संस्थेने पुढील वर्षाचे (सन २०१९-२०) विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाची परवानगी/ नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहिल.

११. केंद्रशासनाच्या संदर्भाधीन क्र.३ मधील पत्रात नमूद अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

३. सदर आदेश हे केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दिनांक १७/१०/२०१८ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अजित सासुलकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
सचिव, भारत सरकार, आयुर्वेद, योग व प्राकृतिक चिकित्सा, यूनानी, सिध्द एवं होमिओपॅथिक (आयुष) मंत्रालय, आयुष भवन, बी ब्लॉक, जी.पी.ओ.कॉम्प्लेक्स, आई.एन.ए, नवी दिल्ली-११० ०२३.
निबंधक,भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, ६१-६५,इन्स्टिटयूशनल एरिया,जनकपुरी, नवी दिल्ली-११० ०५८.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, आयुष संचालनालय,मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
सचिव,शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
प्राचार्य, प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद कॉलेज व श्री.एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि.अहमदनगर
निवडनस्ती (शिक्षण-२)

c

**प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय व श्री. एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि. अहमदनगर. नवीन आयुर्वेद पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी.**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,**
गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
शासन निर्णय क्रमांक पीजीए १२१३/प्र.क्र.१६१/१३/शिक्षण-२
दिनांकः- २७ ऑक्टोंबर, २०१५.

**वाचा:-** १) शासनाचे समक्रमांकित ना-हरकत प्रमाणपत्र, दिनांक ०६.०६.२०१४.
२) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुंटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांचे क्र. आर. १४०११/५३/२०१४-ईपी (आयएम-१), दिनांक ०१.१०.२०१५.

**प्रस्तावना:-** प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय व श्री.एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि. अहमदनगर या संस्थेस "प्रसुती एवं स्त्रिरोगा" आणि "शल्यतंत्र (सामान्य)" या दोन विषयात प्रत्येकी ०३ इतक्या प्रवेशक्षमतेसह नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास संदर्भ क्र.(१) अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर संस्थेस संदर्भ क्र. (२) अन्वये केंद्र शासनाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांनी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून "प्रसुती एवं स्त्रिरोगा" आणि "शल्यतंत्र (सामान्य)" या दोन विषयात प्रत्येकी ०३ इतक्या प्रवेशक्षमतेसह नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून उक्त विषयांत नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. (२) अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन याद्वारे प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय व श्री.एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि. अहमदनगर या संस्थेस सन २०१५-१६ ते सन २०१९-२० या शैक्षणिक सत्राकरीता "प्रसुती एवं स्त्रिरोगा" आणि "शल्यतंत्र (सामान्य)" या दोन विषयात प्रत्येकी ०३ इतक्या प्रवेशक्षमतेसह नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

**अटी व शर्ती:-**

१. या आयुर्वेद महाविद्यालयातील प्रसुती एवं स्त्रिरोगा आणि शल्यतंत्र (सामान्य) या दोन विषयांतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार प्रत्येकी ०३ इतकी राहील.
२. राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.
३. शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

PMT'S AYURVED COLLEGE IN WARD NO. 5676

४. केंद्र शासन, भारतीय चिकीत्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७. शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

९. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई अथवा कायद्याव्दारे गठीत तत्सम प्राधिकरण यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समिती मुंबई अथवा कायद्याव्दारे गठीत तत्सम प्राधिकरण यांच्याकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१०. केंद्र शासनाने दिलेली सदर मान्यता ही उक्त अभ्यासक्रमास सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांची तुकडी सदर अभ्यासक्रम पुर्ण करेपर्यंतच्या कालावधीकरीता असल्याने संस्थेने त्यानंतरचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाची तसेच त्या आधारे राज्य शासनाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३. सदर आदेश संदर्भीत केद्र शासनाच्या दि.०१.१०.२०१५ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अंजली वि.अंभिरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई.
प्राचार्य, प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय व श्री.एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव, जि. अहमदनगर .
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती / शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
मा.मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
निवडनस्ती (शिक्षण-२)

प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय,
शेवगाव जि. अहमदनगर.
नवीन आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम
सुरु करण्यास परवानगी.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,**
गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
शासन निर्णय क्रमांक पीजीए १२१३/प्र.क्र.१०९/१३/शिक्षण-२
दिनांक:- २० ऑक्टोबर, २०१४

**वाचा:-** १) शासनाचे समक्रमांकित ना-हरकत प्रमाणपत्रे, दिनांक २३.०४.२०१३.
२) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांचे पत्र क्र.आर. १४०११/२७/२०१३-ईपी (आयएम-१) व क्र.आर. १३०११/०७/२०१३-ईपी (आयएम-१), दिनांक १४.१०.२०१४.

**प्रस्तावना:-** प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, शेवगाव जि. अहमदनगर या महाविद्यालयात १) कायाचिकीत्सा, २) द्रव्यगुण व ३) शालक्यतंत्र - नेत्र रोग या तीन विषयात नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास संदर्भ क्र.(१) अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर संस्थेस संदर्भ क्र.(२) अन्वये केंद्र शासनाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांनी सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून १) कायाचिकीत्सा, २) द्रव्यगुण व ३) शालक्यतंत्र - नेत्र रोग या तीन विषयात अनुक्रमे ०६, ०३ व ०६ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून उक्त तीन विषयात नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. (२) अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन याद्वारे प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, शेवगाव जि. अहमदनगर या संस्थेस सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून १) कायाचिकीत्सा, २) द्रव्यगुण व ३) शालक्यतंत्र - नेत्र रोग या तीन विषयात अनुक्रमे ०६, ०३ व ०६ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

**अटी व शर्ती:-**

१) या आयुर्वेद महाविद्यालयातील कायाचिकीत्सा, द्रव्यगुण व शालक्यतंत्र - नेत्र रोग या विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार अनुक्रमे ०६, ०३, व ०६ एवढी राहील.
२) राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.
३) शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) केंद्र शासन, भारतीय चिकीत्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७) शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

९) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१०) केंद्र शासनाने दिलेली सदर मान्यता ही उक्त अभ्यासक्रमास सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांची तुकडी सदर अभ्यासक्रम पुर्ण करेपर्यंतच्या कालावधीकरीता असल्याने संस्थेने त्यानंतरचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाची तसेच त्या आधारे राज्य शासनाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३. सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भीत केद्र शासनाच्या दिनांक १४.१०.२०१४ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अंजली वि. अंभिरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.राज्यपालांचे सल्लागार, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
प्राचार्य, प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, शेवगाव जि. अहमदनगर
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट मेडिकल ॲण्ड डेंटल कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री.जी.हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई-०१
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती / शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
निवडनस्ती (शिक्षण-२)

PMT'S AYURVED COLLEGE
INWARD NO. 3822
20.10

E

प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, शेवगाव, जि. अहमदनगर.

पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
शासन निर्णय क्रमांक पीजीए १०११/प्र.क्र.१३२/१३/शिक्षण-२
दिनांक:- १८ नोव्हेंबर, २०१३

वाचा:- १) शासनाचे समक्रमांकित ना हरकत प्रमाणपत्र, दिनांक २८.०४.२०११

२) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुंटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांचे पत्र एफ.क्र.आर-१४०११/३८/२०१२-ईपी (आयएम-१), दि.२४.१०.२०१३.

प्रस्तावना:- प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, शेवगाव, जि. अहमदनगर या संस्थेस रचना शरीर, रसशास्त्र एवम् भैजस्य कल्पना व आयुर्वेद संहिता या एकुण ०३ विषयात आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास संदर्भ क्र.(१) अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर संस्थेस संदर्भ क्र.(२) अन्वये केंद्र शासनाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांनी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून वरील एकुण ०३ विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम अनुक्रमे ०६, ०६ व ०५ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार, या संस्थेस सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून वरीलप्रमाणे एकुण ०३ विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. (२) अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन याद्वारे प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, शेवगाव, जि. अहमदनगर या संस्थेस सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून रचना शरीर, रसशास्त्र एवम् भैजस्य कल्पना व आयुर्वेद संहिता या एकुण ०३ विषयात आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम अनुक्रमे ०६, ०६ व ०५ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

अटी व शर्ती:-

१) या आयुर्वेद महाविद्यालयातील रचना शरीर, रसशास्त्र एवम् भैजस्य कल्पना व आयुर्वेद संहिता या एकुण ०३ विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार अनुक्रमे ०६, ०६ व ०५ एवढी राहील.

२) राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.

३) शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) केंद्र शासन, केंद्रिय भारतीय चिकीत्सा परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७) शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

९) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भीत केंद्र शासनाच्या दिनांक २४.१०.२०१३ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अंजली वि. अंभिरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई.
प्राचार्य, प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, शेवगाव, जि. अहमदनगर ४१४ ५०२.
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट मेडिकल ॲण्ड डेंटल कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री.जी.हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई-०१
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती / शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
मा.मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
निवडनस्ती (शिक्षण-२)